# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २६२ वा ❑ रविवार दि.१४ डिसेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## शहाबाज शरीफ यांचा घनघोर अपमान

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आंतरराष्ट्रीय शांतता आणि विश्वास मंचात सहभागी होण्यासाठी तुर्कमेनिस्तानमध्ये आले होते. परंतु रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांना भेटण्याच्या इच्छेने त्यांनी स्वतः‌चा ,घनघोर अपमान करून घेतले.पुतिन, तुर्कीचे अध्यक्ष एर्दोगान आणि पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ हे देखील आंतरराष्ट्रीय शांतता आणि विश्वास मंचाच्या बैठकीला पोहोचले होते. शाहबाज शरीफ आणि पुतिन यांची भेट होणार होती. परंतु पुतिन यांनी पाकिस्तानी पंतप्रधानांना सुमारे ४० मिनिटे वाट पाहण्यास भाग पाडले.

या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये शाहबाज पुतिनची वाट पाहत असल्याचे दिसत आहे. यावेळी शाहबाज खूपच अस्वस्थ दिसत होते. त्यांच्या मंत्रिमंडळातील अनेक वरिष्ठ मंत्री देखील त्यांच्यासोबत उपस्थित होते, ज्यांच्याशी ते प्रत्यक्ष संवाद साधताना दिसले.

खरं तर, रशियाचे अध्यक्ष पुतिन, तुर्कीचे अध्यक्ष रेसेप तय्यिप एर्दोगान आणि पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ हे आंतरराष्ट्रीय शांतता आणि विश्वास मंचात सहभागी होण्यासाठी तुर्कमेनिस्तानमध्ये आले होते. पुतिन आणि एर्दोगान अनेक बैठकांमध्ये गुंतले होते. दरम्यान, पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ अस्वस्थ होत होते.

या बैठकीसाठी शहबाज शरीफ आपल्या ठरलेल्या वेळेत बैठकीच्या ठिकाणी पोहोचले, ते जवळपास ४० मिनिटं त्या ठिकाणी रशियाचे राष्ट्रपती पुतिन यांची वाट पाहात थांबले, मात्र पुतिन यांनी शरीफ यांची भेट घेतलीच नाही, ते तुर्कीचे राष्ट्रपती रेसेप तैयप यांच्यासोबत एका बैठकीमध्ये व्यस्त असल्यामुळे पुतिन यांनी शरीफ यांची भेट घेतलीच नाही, अखेर ४० मिनिटांनंतर शरीफ हे बैठकीच्या नियोजित स्थळावरून बाहेर पडले, यावेळी त्यांचा चेहरा उतरलेला दिसत होता. कारण या बैठकीमध्ये शरीफ हे पुतिन यांच्यासोबत अनेक महत्त्वाच्या गोष्टींवर चर्चा करणार होते.

शाहबाज शरीफ पुतिन यांना भेटण्यासाठी तुर्कमेनिस्तानमध्ये निमंत्रण न देता पोहोचले होते. मात्र, पुतिन यांनी त्यांना भेटण्यास नकार देऊन त्यांचा अपमान केला. शाहबाज शरीफ यांच्यासोबत पाकिस्तानचे उपपंतप्रधान इशाक दार देखील उपस्थित होते.

ही पहिलीच घटना नाही; ऑगस्टमध्ये पुतिन यांनी पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत शाहबाज यांना दुर्लक्षित केले होते. त्यानंतर, शाहबाज शरीफ यांनी पुतिन यांना सांगितले की त्यांचे भारताशी मजबूत संबंध असले तरी, त्यांना त्यांच्याशीही संबंध निर्माण करायचे आहेत.

दुसरीकडे काही दिवसांपूर्वीच पुतिन हे भारत दौऱ्यावर होते, पुतिन यांच्या या दौऱ्यावेळी भारत आणि रशियामध्ये अनेक महत्त्वाचे करार झाले आहेत. रशिया भारताला कधीही कच्चे तेल कमी पडू देणार नाही अशी घोषणा पुतिन यांनी आपल्या या दौऱ्यात केली आहे, हा पुतिन यांचा अमेरिकेसाठी मोठा झटका मानला जात आहे. एकीकडे पुतिन यांनी भारत दौरा केला, मात्र दुसरीकडे ते साधे पाकिस्तानच्या पंतप्रधानांना भेटले सुद्धा नाहीत, त्यामुळे आता पाकिस्तानचा जळफळाट आणखी वाढण्याची शक्यता आहे.

तुर्कमेनिस्तानची राजधानी येथे आयोजित आंतरराष्ट्रीय शांतता आणि विश्वास मंचाच्या उद्घाटनप्रसंगी पुतिन म्हणाले, ‘‘अगदी ३० वर्षांपूर्वी, १२ डिसेंबर रोजी, संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने तुर्कमेनिस्तानच्या तटस्थतेला औपचारिक मान्यता दिली. अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे, विकास मॉडेलचा आदर करणे आणि परंपरांचे संरक्षण करणे हे आजच्या जगात अधिक प्रासंगिक आहे.‘‘ रशिया–तुर्कमेनिस्तान धोरणात्मक भागीदारीचे उदाहरण देत, त्यांनी २०२५ पर्यंत व्यापार, ऊर्जा आणि वाहतूक प्रकल्पांचा ३५ टक्क्यांनी विस्तार करण्याचा उल्लेख केला.







# मोरपीस आणि पिंपळपान ललित लेखसंग्रहाचे प्रकाशन

## सौंदर्य आणि वास्तवाचा सुरेख संगम, डॉ. न.म. जोशी यांचे प्रतिपादन

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – डॉ. रामचंद्र उर्फ बाळ परांजपे लिखित मोरपीस आणि पिंपळपान या ललित लेखसंग्रहाचे प्रकाशन नुकतेच सदाशिव पेठेतील भारत इतिहास संशोधक मंडळाच्या सभागृहात झाले. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. न. म. जोशी यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी डॉ. रामचंद्र आणि रमा परांजपे यांनी भारत इतिहास संशोधक मंडळाला १ लाख रुपयांची देणगी दिली.

गेल्या ५० ते ७० वर्षांमध्ये जीवनप्रणालीचे चित्र बदलले आहे. खेडी ओस पडली आणि शहरे भरभरून गेली. जीवनशैलीतील हे बदल मोरपीस आणि पिंपळपान या



ललित लेखसंग्रहामध्ये उत्तमपणे टिपले आहेत. या पुस्तकात वाचकांना जीवनातील सौंदर्य आणि वास्तवाचा सुरेख संगम अनुभवता येईल, असे मत डॉ. न. म. जोशी यांनी व्यक्त केले.

स्मिता टाईपसेटर्स, पुणे आणि डॉ. रामचंद्र उर्फ बाळ परांजपे यांच्या वतीने या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. व्यासपीठावर ज्येष्ठ पत्रकार व निवेदक सुधीर गाडगीळ, लेखक डॉ. रामचंद्र परांजपे आणि स्मिता टाईपसेटर्सचे हेमंत जोशी उपस्थित होते.

यावेळी डॉ. रामचंद्र परांजपे यांचे वडील ॲड. वि. रा. उर्फ बापूसाहेब परांजपे यांच्या स्मरणार्थ डॉ. रामचंद्र आणि रमा परांजपे यांनी भारत इतिहास संशोधक मंडळाचे पांडुरंग बलकवडे यांच्याकडे १ लाख रुपयांची देणगी सुपूर्द केली.


ज्येष्ठ पत्रकार सुधीर गाडगीळ यांनी पुस्तकाचे कौतुक केले. ते म्हणाले की, या ललित लेखसंग्रहातील शीर्षके अतिशय उत्तम आहेत. सोप्या मराठीमध्ये आयुष्याचे धावते वर्णन हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे. वाचकांची उत्सुकता वाढवणारे हे पुस्तक असून रेखाचित्रांमुळे याला अधिकच उठावदारपणा आला आहे.

लेखक डॉ. रामचंद्र परांजपे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, लेखाचे आशयानुरूप शीर्षक, सुंदर आणि अर्थपूर्ण रेखाचित्रे तसेच विविधांगी संस्कृतीचे दर्शन वाचकांना घडविण्याचा प्रयत्न पुस्तकात केला आहे. या ललित लेखसंग्रहामध्ये २७ लेखांचा अंतर्भाव आहे. आपले सणवार, परंपरा, जीवनशैली याबाबतचे अनेक संदर्भ लेखांमध्ये असून, वर्णनशैली प्रासादिक आणि सहजसंवादी असल्याने संदेश वाचकांपर्यंत सहज पोहोचेल.

# श्री दत्त चमत्कार अनुभूती

**ज्योतिर्मय साहित्य**

नुकताच ४ डिसेंबर रोजी श्री दत्त जन्मोत्सव सोहळा महाराष्टात सर्वत्र उत्साहाने व आनंदाने पार पडला. या निमित्ताने माझे स्नेही व मित्र श्री संजय व्यापारी सर यांनी राक्षस भवन येथे श्री वरद दत्त जन्मोत्सव सोहळ्या निमित्ताने एक स्मरणिका प्रकाशित केली आहे.




त्यात महाराष्ट्रातील विविध साहित्यिक व दत्त भक्तांचे अनुभव, अनुभूती या बद्दल खूप सुंदर लेख आहेत. यात माझाही व माझी पत्नी सौ रचनाही लेख आहे.

या संबंधी गंमत अशी झाली की, सर्व लेखकांना ही स्मरणिका पोस्टाने मिळाली पण मला मात्र लवकर मिळाली नाही. सर्वांना आपला लेख, फोटो पाहण्याची उत्सुकता असतेच, तसेच इतरांचे लेख वाचण्याचा आनंद ही असतो पण मला मात्र ही स्मरणिका न मिळाल्यामुळे मी, आणि रचना दोघेही नाराज झालो. पण श्री संजय व्यापारी सर फोनवर म्हणाले होते, मिळेल हो, नक्की मिळेल. मला विश्वास आहे पोस्ट खात्यावर व श्रद्धा, विश्वास आहे श्री दत्तात्रयावर, तो भक्तांना नाराज करत नाही. कदाचित दत्त महाराज माझी परीक्षा घेत असावेत.



*गिरीश वसेकर ( देशपांडे)*
*नांदेड सिटी, पुणे ९४२२६५९४००*

खरं तर मानवी मनाचा संयम ढळला की माणूस बैचेन होतो, असेच आम्हा उभयतांना झाले होते. मात्र काल दिनांक १२ डिसेंबर रोजी आम्ही उभयतां स्कुटीवर बाहेर जाण्यास निघालो, तेंव्हा सुरक्षा रक्षक मला म्हणाला, सर आताच पोस्टमन आला होता, तुमच्या लेटर बॉक्स मध्ये काही तरी टाकले आहे.

तेंव्हा मी स्कुटी थांबवून, लेटर बॉक्स मधील ते पॉकेट बाहेर काढले तर, मी ज्याची आशा सोडली होती, ती श्री वरद दत्त जन्मोत्सव सोहळा निम्मित असलेली स्मरणिका होती. मी पॉकेट तेथेच फोडले तेंव्हा ती सुंदर स्मरणिका अंक व श्री दत्ताचा फोटो पाहून मन प्रसन्न झाले व अगदी सहज मुखातून शब्द बाहेर पडले, वाह किती सुंदर, अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त.

जास्त उशीर होत होता म्हणून, मी ते पुस्तक वरच्या मजल्यावरील फ्लॅट मध्ये घरात न नेऊन ठेवता स्कुटीच्या डिकीत ठेवले.

यामुळे खरं तर आम्हाला दहा मिनिटे उशीर झाला आणि पुढे निघालो. पुढे काही अंतरावर माझ्या समोर मोटर सायकलवर असलेल्या एका व्यक्तीच्या डोक्याच्या आसपास रस्त्यावर लटकणारा पतंगाचा मांजा अचानक गुंडाळला गेला होता.

कसाबसा त्याने तो काढला व ती व्यक्ती थोडक्यात बचावली पण माझी उंची पाहता, मी त्या क्षणी तिथे पोहचलो असतो तर त्या मांजाचा दोरा नक्कीच माझ्या गळ्याभोवती गुंडाळल्या गेला असता आणि काही तरी अघटीत घडले असते.

पण माझ्या सोबत श्री दत्त स्मरणिका होती व निघताना ती घेण्यात वेळ गेला म्हणून मी इकडे अवघ्या क्षणांच्या उशिराने पोहचलो होतो व थोडक्यात वाचलो होतो. या घटनेला, माझी पत्नी सौ रचना साक्षी आहे. कामे करून आम्ही घरी आल्यावर ती स्मरणिका हातात घेऊन त्यावर मी डोके ठेवले, त्यावेळी त्या स्मरणिकेवरील फोटोमधे असलेले दत्तात्रय जणू माझ्याकडे बघून हसत होते व म्हणत होते, अजूनही तू संयम ठेवत नाहीस भक्ता, मी मुद्दाम उशीरा आलो, आज तुला होणारी इजा टाळायची होती, म्हणून!

माझ्या डोळ्यातून नकळत अश्रू टपकले, तेव्हा रचना म्हणाली, अहो रडताय की काय? अहो, तुम्ही ठीक आहात, मी काही बोलण्याच्या आत ती म्हणाली, दोघेही एकदम


म्हणू या, बोला, अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त

***

# जिल्हास्तरीय स्पर्धेत रंजना सानप यांचे यश

**ज्योतिर्मय साहित्य**

**सातारा** – ९९ व्या अखिल भारतीय संमेलनाच्या निमित्ताने जिल्हा परिषद शिक्षण विभाग प्राथमिक यांच्यावतीने स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत रंजना सानप यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी गटात स्वरचित कविता व कथाकथन यामध्ये तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवून त्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरल्या होत्या. जिल्हास्तरावर त्यांनी कथाकथन स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक तर स्वरचित कवितेमध्ये तृतीय क्रमांक मिळवला आहे. त्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोहितेमळा (चितळी) येथे कार्यरत आहेत.



त्यांच्या या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी सौ. सोनाली विभूते, विस्ताराधिकारी– संगीता गायकवाड, केंद्रप्रमुख श्री. रफिक मुलाणी, मुख्याध्यापक श्री.राजाराम गायकवाड, शाळा व्यवस्थापन समिती, विद्यार्थी व पालकांनी त्यांचे अभिनंदन केले.

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख - ११६




*"ज्योतिर्मय"च्या वाचकांचा निरोप घेण्याच्या मार्गाकडे "वास्तुशास्त्र पेंटींग" हा स्तंभ वाटचाल करतो आहे.आपण गेल्या ११५ लेखांच्या माध्यमातून एका अनोख्या, अद्भुत, आणि अनभिज्ञ राहीलेल्या विषयाची माहिती घेतली.*

*अशी माहिती देण्याचा उद्देशही तितकाच पारदर्शी राहीला. रंग, वार, ग्रह त्यांची रत्ने, यांचाही एकमेकांशी कसा संबंध आहे... या संदर्भात आपण एक धावती माहिती घेऊयात. प्रत्येक ग्रहाचे एक विशिष्ट रंग आणि त्या रंगाशी जुळणारे रत्न असते.*

*"लाल" रंगाचे "माणिक", हे सूर्य अर्थात रविचे ग्रहाचे आहे. "पिवळ्या" रंगाचे रत्न "पुष्कराज" हे गुरु ग्रहाचे रत्न आहे. "हिरव्या" रंगाचा "पांचू" हा बुध या ग्रहाचे रत्न आहे. त्या ग्रहांच्या नावांवरून सात वारांची नांवे, ज्योतिषशास्त्रात सांगितलेली आहेत. "निळा" रंग हा "नीलम" किंवा "नीलमणी" या रत्नाशी संबंधित आहे. हे प्रमुख रंग आणि रत्न हे त्या त्या ग्रहांची ऊर्जा वाढवण्यासाठी वापरले जातात. औषधोपचारांसाठी जशी तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याची आवश्यकता असते तव्दतच रत्न धारण करण्यासाठी ज्योतिष शास्त्राच्या अभ्यासकांची वा संबंधित तज्ज्ञाची आवश्यकता असते."पांढरा" रंग हा "होती" या समुद्री रत्नाशी संबंधित आहे. "मोती" हा 'चंद्र' या ग्रहाचे रत्न आहे. "लाल" किंवा "शेंदरी" रंगाचे "पोवळे" किंवा "प्रवाळ" या रत्नाशी संबंध आहे. ह्या रत्नाचं 'मंगळ' या ग्रहाशी नातं आहे. "गुलाबी" किंवा "पांढरा रंग" हा 'हिरा' या रत्नाशी संबंधित आहे. "हिरा" हे रत्न "शुक्र" या ग्रहाशी नातं दर्शवतो, 'शुक्र' हा कला व सौंदर्य यांचा कारक आहे. या सात वारांच्या सात ग्रहां शिवाय दोन ग्रह मानलेले आहेत. पैकी "राहू" चे रत्न "गोमेद" असून त्याचा रंग "गडद बीट" या फळभाजी सारखा असतो. "केतु" या ग्रहाचा रंग "राखाडी" किंवा "पिवळसर" आहे. त्याचे रत्न "लसनीया" आहे. "वास्तुशास्त्र पेंटींग" निर्माणाच्या वेळीही, पेंटिंग रंगवतांना विचार केला जातो. या ठिकाणी सर्वात लाभदायक बाब म्हणजे केवळ सकारात्मकच रंगयोजनांच्या या पेंटींग पासून निघणारी रंगकिरणे, जातकाच्या कुटुंब सदस्यांवर सकारात्मकच प्रभाव टाकतात.*

क्रमश :

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238